## स्वाध्याय

### प्रश्न. 1. खालील व्यापार प्रकारांचे वर्गीकरण करा.

अ) महाराष्ट्र व पंजाब
आ) भारत व जपान
इ) लासलगाव व पुणे
ई) चीन व कॅनडा
उ) भारत व युरोपीय संघ
उत्तर :

प्रदेश विस्तारानुसार
- देशांतर्गत/अंतर्गत व्यापार
  - अ) महाराष्ट्र व पंजाब
  - इ) लासलगाव व पुणे
- आंतरराष्ट्रीय/बहिर्गत व्यापार
  - आ) भारत व जपान
  - ई) चीन व कॅनडा
  - उ) भारत व युरोपीय संघ

### प्रश्न. 2. खालील विधानांसाठी आयात व निर्यात यांपैकी योग्य शब्द लिहा.

1) भारत मध्यपूर्व आशियातील देशांकडून खनिज तेल खरेदी करतो.
उत्तर :
आयात

2) कॅनडामधून आशियाई देशांकडे गहू विक्रीसाठी पाठवला जातो.
उत्तर :
निर्यात

3) जपान आपेक देशांना यंत्रसामग्री पाठवतो.
उत्तर :
निर्यात

## प्रश्न. 3. अयोग्य विधाने दुरुस्त करून पुन्हा लिहा.

1) भारत हा देश स्वयंपूर्ण आहे.

उत्तर :

भारत हा देश स्वयंपूर्ण नाही.

**कारण -** भारताला काही बाबींसाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून राहावे लागते. उदा. पेट्रोल.

2) ज्या ठिकाणी एखाद्या वस्तूचे उत्पादन अतिरिक्त होते, तेथे त्या वस्तूंना मागणी नसते.

उत्तर :

हे विधान योग्य आहे.

ज्या ठिकाणी एखाद्या वस्तूचे उत्पादन अतिरिक्त होते, तेथून त्या वस्तूचा पुरवठा होतो.

3) स्थानिक स्वरूपाच्या व्यापारापेक्षा आंतरराष्ट्रीय व्यापराची प्रक्रिया सहज व सोपी असते.

उत्तर :

हे विधान अयोग्य आहे.

स्थानिक स्वरूपाच्या व्यापारापेक्षा आंतरराष्ट्रीय व्यापाराची प्रक्रिया गुंतागुंतीची असते.

4) आग्नेय आशियाई देशांत आर्थिक विकास, तसेच सामाजिक व सांस्कृतिक सलोखा वाढवण्यासाठी सार्क ही संघटना कार्य करते.

उत्तर :

आग्नेय आशियाई देशांत आर्थिक विकास, तसेच सामाजिक व सांस्कृतिक सलोखा वाढवण्यासाठी आसियान ही संघटना कार्य करते.

प्रश्न. 4. पुढील उदाहरणांतील व्यापाराचा प्रकार ओळखून लिहा.

1) सृष्टीने किरणा दुकानातून साखर आणली.

उत्तर :

किरकोळ व्यापार

2) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा कापूस सुरतेतील व्यापाऱ्यांनी खरेदी केला.

उत्तर :

घाऊक व्यापार

3) समीरने आपल्या शेतातील डाळिंबांची ऑस्ट्रेलियाला निर्यात केली.

उत्तर :

आंतरराष्ट्रीय व्यापार

4) सदाभाऊंनी घाऊक मार्केटमध्ये दुकानात विक्रीसाठी 10 पोती गहू व 5 पोती तांदूळ विकत आणले.


उत्तर :

घाऊक व्यापार

## प्रश्न. 5. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

### 1) व्यापाराच्या प्रकारांचे वर्गीकरण दर्शवणारा ओघतक्ता तयार करा.

उत्तर :




### 2) व्यापार संतुलनाच्या प्रकारांतील फरक सांगा.

उत्तर :

व्यापार संतुलनाच्या प्रकारांतील फरक पुढीलप्रमाणे आहे

**१) प्रतिकूल व्यापार संतुलन** - i) जेव्हा आयातीचे मूल्य हे निर्यातीच्या मूल्यापेक्षा जास्त असते, तेव्हा ते प्रतिकूल व्यापार संतुलन होय.

ii) या व्यापार संतुलनाच्या प्रकारात आयातीचे मूल्य जास्त असते व निर्यातीचे मूल्य कमी असते.

**२) अनुकूल व्यापार संतुलन** - i) जेव्हा निर्यातीचे मूल्य हे आयातीच्या मूल्यापेक्षा जास्त असते, तेव्हा ते अनुकूल व्यापार संतुलन असते.

ii) व्यापार संतुलनाच्या प्रकारात निर्यातीचे मूल्य जास्त असते व आयातीचे भूत कमी असते.

**३) संतुलित व्यापार** - i) जेव्हा आयात व निर्यातमूल्य जवळपास सारखे असते, तेव्हा त्यास संतुलित व्यापार म्हणतात.

ii) या व्यापार संतुलनाच्या प्रकारात आयातीचे व निर्यातीचे मूल्य समान असते.

3) जागतिक व्यापार संघटनेचे उद्देश सांगा.

उत्तर :

जागतिक व्यापार संघटनेचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत. i) आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वाटाघाटींसाठी व्यासपीठ उपलब्ध करणे.

ii) व्यापारविषयक मतभेद हाताळणे.

iii) राष्ट्रांच्या व्यापार धोरणांवर देखरेख ठेवणे.

iv) विकसनशील देशांसाठी तांत्रिक साहाय्य व प्रशिक्षण उपलब्ध करून देणे.

4) ओपेक व आपेक या व्यापार संघटनांच्या कार्यातील फरक सांगा.

उत्तर :

ओपेक व आपेक या व्यापार संघटनांच्या कार्यातील फरक -

| **ओपेक व्यापार संघटना** | **आपेक व्यापार संघटना** |
|---|---|
| i) खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण ठेवणे आणि तेल निर्यातीमध्ये सुसूत्रता राखणे. हे कार्य ओपेक ही संघटना करते. | i) आशिया-प्रशांत महासागर क्षेत्रात मुक्त व्यापार व आर्थिक सहकार्य करणे, हे कार्य आपेक ही संघटना करते. |
| ii) ही संघटना सदस्य देशांतील तेल उत्पादनाचे व दराचे नियंत्रण करते. | ii) ही संघटना सदस्य देशांत प्रादेशिक व तांत्रिक सहकार्याल प्रोत्साहन देते. |

5) आशिया खंडातील कोणत्याही एका व्यापार संघटनेचे कार्य लिहा.

उत्तर :

आशिया खंडातील सार्क या व्यापार संघटनेचे कार्य -

i) दक्षिण आशियातील देशांच्या समान समस्या ओळखून त्यावर समाधानकारक तोडगा काढणे.

ii) सदस्य देशांतील सामाजिक कल्याण, जीवनमान उंचावणे आणि प्रादेशिक सहकार्य वाढवणे.

iii) दक्षिण आशियातील अशांतता दूर करणे.

6) शेतकऱ्यांच्या दृष्टीने विपणनाचे महत्त्व लिहा.

उत्तर :

शेतकऱ्यांच्या दृष्टीने विपणनाचे महत्त्व -

i) शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत मिळण्यासाठी विपणनाची आवश्यकत असते.

ii) शेतकऱ्यांना आपल्या मालाचे योग्य प्रकारे सादरीकरण करण्यासाठी विपणन महत्त्वाचे असते.

iii) शेतमालाची गुणवत्ता त्यानुसार होणारी प्रतवारी, तो माल ग्राहकांपुढे कशाप्रकारे सादर केला जातो, यांवरून त्या मालाची किंमत ठरते. जर शेतमालाबाबत कमतरता असली तर बाजारात त्याला योग्य किंमत मिळत नाही. म्हणून विपणन व्यवस्था महत्त्वाची असते.

iv) विपणनाद्वारे शेतकऱ्यांच्या शेतमालाची गुणवत्ता पाहून सुपरमार्केटमध्ये किंवा मोठ्या मॉलमध्ये त्या शेतमालाची जाहिरात करून तो विक्रीसाठी ठेवला जातो. त्यामुळे त्या शेतमालाला अधिक किंमत मिळते.

प्रश्न. 6. खालील तक्त्यात सन २०१४-२०१५ सालातील काही देशांचे आयात-निर्यात मूल्य दशलक्ष यू. एस. डॉलरमध्ये दिले आहे. या सांख्यिकीय माहितीचा जोड स्तंभालेख तयार करा. स्तंभालेखाचे काळजीपूर्वक वाचन करा व सदर देशांच्या व्यापार संतुलनाबद्दल थोडक्यात लिहा.

उत्तर :

| देश | निर्यात मूल्य | आयात मूल्य |
|---|---|---|
| चीन | 2143 | 1960 |
| भारत | 272 | 380 |
| ब्राझील | 190 | 241 |
| संयुक्त संस्थाने | 1510 | 2380 |

